MHRT100005962025

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५५/२०२५ मधील**
**निशाणी क्र.१ खालील आदेश**
**(अरबाज मुश्ताक बलबले वि. महाराष्ट्र शासन)**

०१. अर्जदार अरबाज मुश्ताक बलबले याने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केलेला असून सदर अर्जानुसार त्याच्या मालकीची जप्त केलेली Tata motors LTD Goods Carrier (MGV) कंपनीची चारचाकी असून तिचा नोंदणीकृत नं.MH-08-AP-0254, इंजिन नंबर 497TC41JSY829444 व चेसीस नंबर MAT507207H8J19165 (यापुढे संक्षिप्ततेकरीता ‘सदर वाहन’ असे संबोधण्यात येते) ही परत मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्ज व त्यासोबत अर्जदाराने दिलेले प्रतिज्ञापत्र वाचले. तपासी अंमलदार व सरकारी अभियोक्ता यांनी त्या अर्जावर दिलेले म्हणणे वाचले. सर्व कागदपत्राचे अवलोकन केले.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात असे कथन आहे की, सदर वाहन हे अर्जदार यांचे असल्याने व ते त्यांचे नित्य वापरातील असून अधिक काळ या खटल्याचे कामी जप्त राहिलेस ते खराब होण्याची तसेच त्यातील पार्टस सडून जाण्याची शक्यता आहे. सदरचे वाहन हे अर्जदार यांचे दैनंदिन वापरातील असून त्यावरच अर्जदार व त्यांचे कुटूंबियांचा उदरनिर्वाह चालत आहे. सदय स्थितीमध्ये अर्जदाराकडे वर नमूद वाहन नसल्याने अर्जदार यांचे अत्यंत हाल होत असून त्यांचा मुख्य व्यवसाय हा अन्नधान्य, भाजीपाला सांगली, कोल्हापूर येथून आणण्याचा असून तसेच सदरचे वाहन भाडयाने देणे तसेच स्वतः वाहतूक करुन त्यातून आपली व आपले कुटूंबियांची उपजीविका चालविणे असा आहे. सदर वाहनाचा श्रीराम फायनान्स कंपनीचा दरमहाचा हप्ता रक्कम रु.३०,०००/- असून सदरचे वाहन अधिक काळ पोलीस स्थानकात राहिल्यास अर्जदारास अन्य कर्ज काढून हप्ता भरणे तसेच कुटूंबियांचे उदरनिर्वाह चालविणे जिकरीचे बनले आहे. सदरचे जप्त वाहन अर्जदारास परत न मिळालेस अर्जदार यांचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न

येणारे नुकसान होणारे आहे. तसेच सदरचा मुद्देमाल अर्जदारास परत मिळालेस अर्जदार त्यामध्ये कोणताही फेरबदल करणार नाही अथवा मुद्देमालाच्या रुपात कोणतेही रुपांतर करणार नाही. तसेच त्यामध्ये कोणतीही छेडछाड करणार नाही अथवा सदरचा मुद्देमाल हा गु.र.नं.१७९/२०२५ चे कामी जप्त असून या न्यायालयातील निकाल लागेपावेतो कोणासही विक्री करणार अथवा कोणाच्याही ताब्यात देणार नाही. तसेच मे. न्यायालय ज्या-ज्या तारखेस वर नमूद मुद्देमाल हजर करावयास सांगेल त्या-त्या वेळेस अर्जदार हजर करतील. तरी मे.न्यायालय ज्या-ज्या अटी व शर्ती देईल त्या-त्या पाळणेस अर्जदार तयार राहतील. तरी केसचा अंतिम निकाल लागेपर्यंत मे. कोर्टाच्या अटी व शर्तीवर परत सदर वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यास विनंती केली आहे.

०३. तपासी अंमलदार यांनी निशाणी क्र.०७ खाली त्यांचे म्हणणे दाखल करुन तीव्र हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे म्हणणेनुसार सदर गुन्हयातील टाटा मोटर कंपनीची गाडी क्र.एम.एच.०८/ए.पी./०२५४ ही गोवंश जनावरे वाहतूक करण्याचा कोणताही परवाना नसताना जनावरांना त्रास होईल अशारितीने अत्यंत दाटीवाटीने १३ गोवंश जनावरे भरुन त्यांची कत्तलीसाठी वाहतूक करताना आरोपी प्रत्यक्षरित्या मिळून आलेले आहेत. सदर गुन्हयातील आरोपी १३ गोवंश जनावरांची पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडून वैद्यकीय तपासणी न करुन घेता वाहतूक करताना मिळून आलेले आहेत. सदर गुन्हयातील अर्जदार आरोपी वाहनांचे हौद्यात कोंडून त्यांना पाणी न देता गोवंश जनावरांना गाडीमध्ये वेदना किंवा यातना होतील अशा रितीने बांधून तसेच हौदयामध्ये त्यांचे खाद्याची कोणतीही व्यवस्था न करता त्यांची कत्तलीकरीता वाहतूक करीत असताना प्रत्यक्षरित्या मिळून आलेले आहेत. अर्जदार आरोपी यास सदरचे वाहन ताब्यात दिल्यास त्याचेकडून पुन्हा गोवंश जनावरे यांचा कत्तलीसाठी वापर होवू शकतो त्यामुळे समाजात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. अर्जदार आरोपी यास सदरचे वाहन ताब्यात दिल्यास आरोपी यास कायदयाचे कोणतेही भय राहणार नाही व आरोपी पुन्हा अशा प्रकारचे गुन्हे करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर टाटा मोटार कंपनीची गाडी क्र.एम.एच.०८/ए.पी./०२५४ मधील गोवंश जनावरे यांचा जनावरे सांभाळण्यासाठी येणारा खर्च सदर वाहनाचे मालक यांचेकडून वसूल करण्यात यावा.(प्रति दिन प्रति

जनावर रु.२००/-) तरी सदर वाहन अर्जदारचे परत ताब्यात देण्यास त्यांचा विरोध आहे. तसेच सदर गुन्हयातील गाडीचे मालक यांचेकडून सदर गुन्हयातील जनावरे सांभाळण्याचा खर्च वसूल करुन गोशाळेस मिळणेस विनंती केली आहे.

०४. प्रस्तुतकामी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकीलांनी म्हणणे देवून प्रस्तुत अर्जास तीव्र हरकत नोंदविली आहे. त्यांचे म्हणणेनुसार सदरील वाहन अर्जदारास परत दिल्यास या वाहनाचा वापर पुन्हा गोवंश जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक करण्याकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरील वाहन अर्जदार यास परत मिळाल्यास त्यांना कायदयाचे भय राहणार नाही व ते पुन्हा राजरोसपणे गुन्हेगारी कृत्ये करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचा गुन्हा दाखल झालेपासून सदर गुन्हयातील गोवंश हे एका गोशाळेचे ताब्यात देण्यात आलेली आहे त्यांचा देखरेखीचा खर्च सदरची गोशाळा करीत आहेत. सदरचा खर्च गुन्हयातील गाडीच्या मालकांकडून वसूल करुन गोशाळेस देणेत यावी अशी विनंती आहे.

०५. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार याने सदर वाहनाची मालकी दर्शविणेकरीता निशाणी क्र.१०/१ येथे आर.सी.बुकची व्हेरीफाईड प्रत, निशाणी क्र.५/२ येथे इन्शुरन्स पेपर्सची प्रत, निशाणी क्र.५/३ येथे अर्जदारचे ड्रायव्हींग लायसन्सची प्रत व निशाणी क्र.५/४ येथे अर्जदारचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत अशी कागदपत्रे याकामी हजर केलेली आहेत. प्रस्तुत प्रकरणी प्रस्तुत अर्ज, तपासिक अंमलदार व सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकनावरुन सदर वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे असल्याचे दिसून येते. अर्जदार याच्या कथनानुसार त्याचा सदरचा वाहन हे अधिक काळ जप्त राहिलेस ते खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदार याचा अर्ज सशर्त अंशतः मंजूर करण्यास हरकत नाही असे माझे मत झाले आहे. तरी अन्य कोणत्याही व्यक्तीने सदर मुद्देमालाबाबत दावा दाखल केलेला नाही. परिणामी, सदर अर्जदार यास सदर जप्त मोबाईलचा अंतरिम ताबा देणे योग्य वाटते. करीता, अर्ज अंशत: मंजूर करणे योग्य वाटते.

०६. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. मा. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई देसाई वि. गुजरात सरकार या प्रकरणात पोलीसांनी जप्त केलेले वाहन त्याच्या मालकाला १५ दिवसांच्या आत परत करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. तरी अन्य कोणत्याही व्यक्तीने त्याबाबत दावा दाखल केलेला नाही. परिणामी अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. सबब, आदेश खालीलप्रमाणेः

आदेश

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पोलीस निरिक्षक, राजापूर पोलीस ठाणे यांना आदेशित करण्यात येते की, प्रस्तुत कामातील अर्जदार अरबाज मुश्ताक बलबले यांच्या मालकीची Tata motors LTD Goods Carrier (MGV) कंपनीची चारचाकी असून तिचा नोंदणीकृत नं.MH-08-AP-0254, इंजिन नंबर 497TC41JSY829444 व चेसीस नंबर MAT507207H8J19165 हीचा अंतरिम ताबा रु.१५,००,०००/- च्या सुपुर्तनाम्यावर अर्जदार यांना देण्यात यावे.

३. अर्जदार यांस Tata motors LTD Goods Carrier (MGV) कंपनीची चारचाकी असून तिचा नोंदणीकृत नं.MH-08-AP-0254, इंजिन नंबर 497TC41JSY829444 व चेसीस नंबर MAT507207H8J19165 हे वाहन परत मिळाल्यानंतरः-

अ. न्यायालय सांगेल तेव्हा ते पुराव्याकामी हजर करावे.

ब. सदरचे वाहन हे कोणाला विकू नये किंवा हस्तांतरीत करु नये किंवा त्याच्या बाहयरुपात कोणताही बदल करु नये.

क. अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेल्या वस्तू त्यांना मिळाल्यास इतर कोणत्याही गुन्हयात त्यांचा वापर करू नये.

४. पोलीस निरिक्षक, राजापूर पोलीस ठाणे यांना आदेशीत करण्यात येते की, अर्जदार यांना Tata motors LTD Goods Carrier (MGV) कंपनीची चारचाकी असून तिचा नोंदणीकृत नं.MH-08-AP-0254, इंजिन नंबर 497TC41JSY829444 व चेसीस नंबर MAT507207H8J19165 हे वाहन देण्यापुर्वी त्याचे फोटो काढून त्याचा पंचनामा करावा.

SWARANJALI SUDHAKAR HAKKE

Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.06.02 17:15:14 +0530

**(**एस**.** एस**.** हाके**)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**,**
राजापूर**.**

दिनांक**-** ०२/०६/२०२६**.**

**CERTIFICATE**

"Judgment/Order in :- Cri. M. A. No.55/2025

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

Name of Stenographer:- M. N. Patil.
Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.
Date of Decision :- 02-06-2026
Order signed by P.O. on :- 02-06-2026
Order Digitally signed by P.O. on :-02-06-2026
Order uploaded on :- 02-06-2026